महासागर

पालघर

गुरुवार, ३ जुलै २०२५

# स्लॅब दुर्घटनेप्रकरणी दोन अधिकाऱ्यांचे निलंबन

## दोन शाळकरी मुलांचा झाला होता मृत्यू

**डहाणू, दि. २ : प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत चळणी अंतर्गत येणाऱ्या सुखडआंबा गावातील जलजीवन मिशन योजनेतील टाकीचा स्लॅब कोसळून १७ मार्च २०२५ रोजी दोन शाळकरी मुलींचा मृत्यू झाला असून एक मुलगी जखमी झाली होती. याविषयी आमदार विनोद निकोले यांनी सध्या मुंबईत सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी प्रश्न उपस्थित केला होता. निकोलेंच्या प्रश्नाला पाणीपुरवठा तथा स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी समाधानकारक उत्तर दिले असून दोन अधिकाऱ्यांचे तत्काळ निलंबन करत असल्याचे जाहीर केले.

सुखडआंबा येथील घटनेनंतर तत्काळ ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पंचायत समितीमधील कंत्राटी कर्मचाऱ्याचे निलंबन करण्यात आले होते. याप्रकरणी पाणी पुरवठा विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, कंत्राटदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा आणि मृत मुलींच्या कुटुंबीयांना अधिकची भरपाई द्यावी यासाठी आमदार विनोद निकोले यांनी लक्षवेधी उपस्थित केला.

याला उत्तर देताना पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी याप्रकरणी पाणी पुरवठा विभगातील उपअभियंता बी.के.शिंदे आणि कार्यकारी अभियंता आर.आर. पाध्ये यांचे तत्काळ निलंबन करत असल्याचे जाहीर करत ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्याची सूचना देण्याचे सांगितले असून, मृत मुलींच्या कुटुंबीयांना अधिकची भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

चळणी ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत सुखडआंबा येथे जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाणी साठवून गावात वितरण करण्यासाठी जलकुंभ बांधण्यात आले होते. या जलकुंभावर १७ मार्च रोजी तीन मुली गेल्या असताना यातील दोन मुलींचा टाकीचा स्लॅब कोसळल्यामुळे उंचावरून खाली पडून दुर्दैवी मृत्यू झाा असून एक मुलगी थोडक्यात बचावली होती. या प्रकरणामुळे जिल्ह्यातील जलजीवन मिशन योजनांच्या कामावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले असून योजनेच्या कामांची चौकशी करण्याची गरज व्यक्त होत आहे.

सुखडआंबा येथील घटनेनंतर पाणी पुरवठा विभगातील कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे. उपअभियंता आणि कार्यकारी अभियंता यांच्यावर कारवाई करण्याचे अधिकार वरिष्ठ पातळीवर अधिकाऱ्यांकडे असून त्यांच्याकडून आलेल्या आदेशानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

**- मनोज रानडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर**

# भूमिहीन आदिवासींना मिळालेल्या जमिनीचा ठावठिकाणा लागेना ?

## पीक लागवडीसाठीच्या जमिनी पीक लागवडीपासून वंचित

## चतु:सीमा निर्धारित नसल्याने धारकांमध्ये मालकी हक्कासाठी संभ्रम

**पालघर, दि. २ : प्रतिनिधी**

१९७२ साली पालघर पूर्वेकडील आदिवासी आणि अन्य जमातीचे मागासलेल्या भूमिहीन लोकांना पीक लागवडीसाठी शासनाकडून देण्यात आलेल्या जमिनी आजमितीस लागवडी विनाच असल्याचे समोर आले आहे. वन जमिनी तत्कालीन वेळेत भूमिहीनांना वाटप करताना प्लॉटना चतु:सीमा निर्धारित केले नसल्याने मालकी हक्काबाबत संभ्रमता निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाकडून वाटप करण्यात आलेल्या बहुतांश या जमिनी लागवडी पासून वंचित असल्याचे समोर आले आहे. या जमिनी हस्तांतरणाचे आदेश ११ मे १९७२ रोजीच्या फेरफार क्रमांक ९०० ने झाले होते.

महाराष्ट्र शासनाच्या भूमिहीन आदिवासी आणि इतर मागासलेले जातीचे लोकांना लागवडीसाठी जमीन उपलब्ध करून देण्याच्या धोरणानुसार वन विभागाच्या जमिनी मोरवाळी गावातील तत्कालीन सर्व्हे क्रमांकातिल वन जमिनी देण्यात आल्या. त्यासाठी शासनाने ठराव क्रमांक : महसूल वन विभाग क्र. एल.एन. डी.१०६९/१४५३२१ अ-१ दिनांक १३ जानेवारी १९६६ रोजीचा आधार घेण्यात आला होता.त्यानुसार मोरवाळी मधील सर्व्हे क्रमांक १५ मध्ये तत्कालीन धारक गुलाब लक्ष्मण कुहरा, प्रभाकर सीताराम, रामा बुधा कामडी, ठक्या काल्या वावरे, गजा दुबळा, बाबू दुबळा अमृत धोडी, बुध्या लाडका कामडी, बिस्तीर गोवारी, हिऱ्या बालसी, सुकुर गोपाल नाईक, यशवंत महादू भूतकडे, माधव चैत्या गोरेकर, कृष्णा दामा गोवारी, सोमा बाळ्या लोहार, गणपत सोम गोवारी,रामजी काकड्या विघने यांना जमिनी देण्यात आल्या.

याप्रकरणात काही घोळ झाले असेल तर तहसीलदार पालघरमार्फत अहवाल मागवून सत्यता पडताळून पुढील कारवाई करू.

**- सुभाष भागडे, निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर**

खरा घोळ तेव्हा सुरु झाला जेव्हा मोरवाळीसह अन्य गावे वेवूरमध्ये समाविष्ठ करून महसुली गाव तयार करण्यात आले. त्यावेळी मोरवाळीतील १ ते २१ हि सर्व्हे क्रमांक तशीच राहिली आणि वेवूर येथील सर्व्हे क्रमांक १ ते १३४ हि स्वतंत्र राहिली. महसूल विभागाला हि चूक लक्ष्यात आल्यानंतर फेरफार क्रमांक ८४५ अन्वये मोरवाळीतील जमिनींच्या मोजणी रजिस्टर नंबर प्रमाणे मोरवाळी येथील १ ते २१ यांना दुरुस्त करून वेवूरमध्ये समाविष्टानंतर १३५ ते १५५ क्रमांकाने अंमल मंजूर करण्यात आले.

महसूल विभागाच्या दुर्लक्षपणामुळे मोठा घोळ झाला होता. ती दुरुस्त करण्यासाठी तत्कालीन तहसीलदार सुरेंद्र नवले यांनी दिनांक २० डिसेंबर २०१२ रोजी तत्कालीन जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख ठाणे लेखी पत्रान्वये कळवले होते. त्यानंतर मोरवाळी येथील १ ते २१ सर्व्हे क्रमांक महसुली वेवूर मध्ये समाविष्ठ होऊन १३५ ते १५५ असे उल्लेख शासकीय दप्तरात नमूद झाले आहे. महसूल गावे निर्माण करताना एकत्रीकरणात झालेला घोळ स्थानिक पातळीवर अनेक जमीन धारकांमध्ये मालकी हक्कां बाबत संघर्ष निमाण झाला आहे. यासाठी जिल्हाधिकारी यांनी एक समन्वय समिती स्थापन करून गावपातळीवर निर्माण झालेले तंटे मिटवण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे, अशी मागणी केली जात आहे.

# उपायुक्त डॉ. सुभाष जाधव यांची मूळ विभागात बदली

## पशुधन अधिकाऱ्यांना नगरविकास खात्यांमध्येच रस; जाधव मूळ विभागात जाणार का याबद्दलच शंका

**पालघर, दि. २ : शशी करपे**

महाराष्ट्रात कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागातील पशुधन अधिकारी असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना गेल्या काही वर्षांपासून नगरविकास विभागात अधिक रस असल्याचे दिसत आहे. वसई विरार महापालिकेत उपायुक्तपदावर कार्यरत असलेले पशुधन अधिकारी डॉ. सुभाष जाधव गेल्या अनेक वर्षांपासून नगरविकास विभागात प्रतिनियुक्तीवर जाऊन विविध महापालिकांमध्ये उपायुक्त म्हणून काम करत आहेत. 30 जून 25 रोजी नगरविकास विभागाने जाधव यांची वसई विरार महापालिकेत असलेली उपायुक्तपदावरील प्रतिनियुक्ती संपुष्टात आणून त्यांना त्यांच्या मूळ कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागात पाठवण्याचे आदेश पारित केले आहेत. मात्र, याआधीही कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागातून नगरविभागात येऊन महापालिकेत पदे उपभोगत असलेले अधिकाऱ्यांना मूळ विभागात पाठवण्याचे आदेश देण्यात आले होते. पण, बहुतांश पशुधन अधिकारी अद्यापही नगरविकास विभागातच ठाण मांडून बसल्याचे दिसत आहे.

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागातील पशुधन अधिकारी डॉ. सुभाष जाधव यांची प्रतियुक्तीवर एक वर्षासाठी उल्हासनगर महापालिकेत उपायुक्तपदावर 15 जुलै 21 रोजी नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर 7 नोव्हेंबर 22 रोजी दोन वर्षांसाठी उल्हासनगर महापालिकेत उपायुक्तपदावरील प्रतिनियुक्तीचा जाधव यांचा कालावधी दोन वर्षांसाठी वाढवण्यात आला होता. उल्हासनगर महापालिकेतील प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यावर जाधव यांना दोन वर्षांसाठी 20 सप्टेंबर 24 रोजी वसई विरार महापालिकेच्या उपायुक्तपदावर प्रतिनियक्तीने पाठवण्यात आले होते. मात्र, दोन वर्षांचा कालावधी संपण्यापूर्वीच आता नगरविकास विभागाने 30 जून 25 च्या आदेशाने त्यांची वसई विरार महापालिकेच्या उपायुक्तपदावरील प्रतिनियुक्ती रद्द केली आहे. तसेच त्यांना कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागातील पशुधन अधिकारीपदावर पाठवण्याचे आदेश जारी केले आहेत.

दरम्यान, हा आदेश येण्यापूर्वी डॉ. सुभाष जाधव यांनी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचे विशेष कार्य अधिकारी म्हणून नियुक्ती होण्यासाठी जोरदार प्रयत्न केले होते. मात्र, नगरविकास विभागात प्रतिनियुक्तीवर असलेल्या जाधव यांना कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाने आपल्या मूळ विभागात हजर होण्याची अट घातली होती. मात्र, कृषीमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी म्हणून जाण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न वाया जाऊन नाहकचा भूर्दंड सोसावा लागेल, यामुळे जाधव यांनी त्यावेळी वसई विरार महापालिकेतच राहणे पसंत केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

त्यातच अचानक नगरविकास विभागातून आलेल्या आदेशाने डॉ. जाधव यांची कोंडी झाली आहे. मात्र, यापूर्वीही कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागातील काही पशुधन अधिकारी अद्यापही नगरविकास विभागात ठाण मांडून बसले असून आपल्या पसंतीच्या महापालिकेत उपायुक्त, अतिरिक्त आयुक्तपदावर कार्यरत आहेत. वसई विरार महापालिकेतील तत्कालीन उपायुक्त डॉ. किशोर गवस हे त्यातीलच एक उदाहरण. वसई विरार महापालिकेत पुन्हा पुन्हा येण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. आता तर उल्हासनगर महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदावरही त्यांनी वजन वापरून वर्णी लावून घेतली आहे. डॉ. जाधव हेही तितकेच वजनदार अधिकारी असल्याने ते सरकारच्या आदेशानुसार मूळ पदावर जातात का, हे येत्या काही दिवसातच स्पष्ट होईल.

### पशुधन अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्यांमध्ये अर्थपूर्ण कानाडोळा?

राज्यात कृषी विभागात पशुधन अधिकाऱ्यांच्या अनेक जागा रिक्त आहेत. परिणामी सर्वसामान्य शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यातच गब्बर झालेले पशुधन अधिकारी सातत्याने नगरविकास विभागातून प्रतिनियुक्तीवर आर्थिकदृष्ट्या ताकदवार महापालिकेतच जात असल्याचे दिसून येत आहे. ही प्रतिनियुक्ती सहजासहजी होत असेल यावर कुणीही विश्वास ठेऊ शकत नाही. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय आणि नगरविकास विभागातील बड्या अधिकाऱ्यांच्या अर्थपूर्ण सहकार्यानेच ही करामत होत असावी, असेच सर्वसामान्यांचे मत आहे.

# विवेक नगर परिसरात भर पावसात पाणीटंचाई

## नगरपंचायतीला आंदोलनाचा इशारा

**वाडा, दि. २ : प्रतिनिधी**

गेल्या सहा महिन्यांपासून वाडा नगरपंचायत क्षेत्रातील विवेक नगर परिसरात कृत्रिम पाणी टंचाई सुरु आहे. या पाणी टंचाई विरोधात येथील रहिवासींनी अनेकदा नगरपंचायत प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत. मात्र त्याची दखल घेतली जात नाही. या पाणी टंचाई विरोधात येथील रहिवाशींनी पुन्हा एकदा नगरपंचायतीला निवेदन देऊन येत्या आठ दिवसांत नियमित पाणी पुरवठा सुरु न केल्यास हंडा मोर्चा काढून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा येथील मुख्याधिकारी मनोज पष्टे यांना दिला आहे.

विवेक नगर, सोनारपाडा रोड परिसरात गेल्या सहा महिन्यांपासून आठवड्यातून दोन ते तीन वेळा पाणी पुरवठा केला जात आहे. तोही अवघा एक ते दिड तास असल्याने अनेकांना पाणी मिळत नाही. यामुळे येथील नागरिकांवर भर पावसात पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकंती करण्याची वेळ आली आहे.

येत्या आठ दिवसांत येथील पिण्याच्या पाण्याची समस्या न सुटल्यास विवेकनगर रहिवाशींच्या आंदोलनात वाडा शहर शिवसेना (उद्धव ठाकरे गट) सहभागी होईल, असा इशारा शिवसेनेचे पालघर जिल्हा संपर्कप्रमुख निलेश गंधे यांनी नगरपंचायत प्रशासनाला दिला आहे. यावेळी शिवसेनेचे तालुकाप्रमुख निलेश पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# डहाणूत मोकाट गुरांचा प्रश्न गंभीर

## 15 दिवसांत कारवाई होणार; सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**डहाणू, दि. २ : प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यात मोकाट गुरांचा प्रश्न दिवसेंदिवस उग्र स्वरूप धारण करत असून, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. शिवाय रस्त्यांवरील अपघातांमध्येही वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर किसान सभेने मोकाट गुरांच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी डहाणूचे सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी विशाल खत्री यांना निवेदन दिले होते. याची प्रशासनाने गंभीर दखल घेत तातडीने पावले उचलली असून, पुढील १५ दिवसांत ठोस उपाययोजना राबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

डहाणूचे सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी विशाल खत्री यांच्या अध्यक्षतेखाली २ जुलै रोजी किसान सभेच्या शिष्टमंडळासह संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत मोकाट जनावरांच्या समस्येवर उपाययोजना आखण्यात आल्या. याबैठकीत डहाणू शहराच्या एन्ट्री गेट याठिकाणी असलेल्या शासकीय जागेतील कोंडवाड्यात मोकाट जनावरे ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ही उपाययोजना तातडीने राबवून पुढील १५ दिवसांत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, मालक असलेल्या जनावरांची तातडीने जबाबदारी निश्चित करून, त्यांना ताब्यात न घेतल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. ग्रामपंचायत व नगरपरिषदेला याबाबत जबाबदारीने कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

डहाणू तालुका हा शेतीप्रधान असून, सध्या भातशेतीचा हंगाम सुरू आहे. मात्र, मोकाट गुरांमुळे अनेक शेतकऱ्यांचे पीक उध्वस्त होत आहे. काही ठिकाणी संपूर्ण शेतीच नष्ट झाल्याच्या घटना घडल्या आहेत. याशिवाय रस्त्यांवर मोकाट फिरणाऱ्या जनावरांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून, विशेषतः रात्रीच्या वेळी अपघातांचे प्रमाण वाढले आहे. यामध्ये नागरिकांची व गुरांची जीवितहानीसुद्धा होत आहे, ज्यामुळे वाहनचालक आणि गोप्रेमींमध्ये वाद, मारहाणीचे प्रकार घडत आहेत, परिणामी कायदा आणि सुव्यवस्था बिघडत आहे.

या पार्श्वभूमीवर २६ जून रोजी किसान सभेने प्रशासनाला निवेदन देऊन मोकाट जनावरांवरील नियंत्रण, त्यांच्या निवाऱ्याची व अन्न-पाण्याची व्यवस्था करण्याची तसेच, शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी केली होती. या मागण्यांची दखल घेत प्रशासनाने तातडीने ही बैठक बोलावली. प्रशासनाच्या या निर्णयाचे नागरिकांनी स्वागत केले असले, तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यंत आवश्यक असल्याचे नागरिकांचे मत आहे. केवळ बैठका आणि आदेश न देता, त्याची नियमित देखरेख आणि जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे, अन्यथा ही समस्या पुन्हा डोके वर काढू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे.

# एसटी बसच्या अपघातात 13 प्रवासी जखमी



मागील दोन वर्षांपासून याठिकाणी संरक्षण भिंतीसाठी पाठपुरावा सुरू आहे. काम मंजूर झाले असले तरी प्रत्यक्ष काम सुरू झालेले नाही. आजच्या अपघाताला हाच ढिसाळ कारभार कारणीभूत आहे.

**- संजय दोडे, ग्रामपंचायत सदस्य, कवडास**

समोरून भरधाव वेगात आलेला ट्रक अचानक आमच्या मार्गिकेत घुसला. मी शक्य तेवढे वाचवण्याचा प्रयत्न केला. उतार आणि चिखलामुळे बस झाडावर आदळली.

**- अर्जुन अनाखे, अपघातग्रस्त बसचालक**

**डहाणू, दि. २ : प्रतिनिधी**

डहाणू-जव्हार मार्गावरील कवडास धरणाजवळ सकाळी साडेनऊच्या सुमारास एसटी महामंडळाच्या लांब पल्ल्याच्या बसला अपघात झाला. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी १३ प्रवासी जखमी झाले आहेत.त्यांच्यावर कासा उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

डहाणूहून संभाजीनगरकडे जाणारी बस तीव्र उतार उतरत असताना समोरून आलेल्या ट्रकने अचानक मार्गिका बदलली आणि बसच्या दिशेने आला. बस चालक अर्जुन अनाखे यांनी प्रसंगावधान राखून बस बाजूला घेतली. मात्र, बाजूला चिखल व खोल उतार असल्याने बस थेट झाडावर आदळली. बसचा पुढील भाग पूर्णपणे उध्वस्त झाला असून झाडाचे खोड केबिनमध्ये घुसले. मात्र, चालकाच्या सतर्कतेमुळे बस खोल दरीत जाण्यापासून वाचली आणि मोठा अनर्थ टळला. बसमध्ये एकूण २६ प्रवासी होते. या अपघातात १३ प्रवासी जखमी झाले असून त्यांना प्राथमिक उपचार देण्यात आले आहेत.

याठिकाणी गेल्या अनेक वर्षांपासून अपघात होत आहेत. या उतारावर संरक्षण भिंत उभारण्याची मागणी वारंवार करण्यात आली आहे. ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत सदस्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागावर हलगर्जीपणाचा आरोप केला आहे. या अपघातानंतर ग्रामस्थांनी संरक्षण भिंतीचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे या रस्त्याच्या सुरक्षिततेबाबत प्रशासन आता तरी गंभीर होणार का? अशा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

# जलशुद्धीकरण केंद्रांवर कायमस्वरूपी जनरेटर बसवा-आ. राजन नाईक

**वसई, दि. २ : प्रतिनिधी**

वसई - विरार शहरात वारंवार वीज खंडित होत असल्यामुळे शहराला अनियमित पाणीपुरवठा होऊन पाणी टंचाई भासत असते. त्यासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या जलशुद्धीकरण केंद्रांवर कायमस्वरूपी जनरेटर बसवण्याची मागणी बुधवारी आमदार राजन नाईक यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना उपस्थित करून केली. यावर सकारात्मक प्रतिसाद देत उर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी या सूचनेचा विचार करून विभागाला निर्देश देण्यात येतील असे आश्वासन दिले. वसई – विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात नव्याने उभी राहणारी गृहसंकुले पाहता पाण्याची गरज अधिक प्रमाणात निर्माण होऊ लागली आहे. पावसाळ्यात अनियमित वीजपुरवठ्यामुळे जलशुद्धीकरण केंद्रांवर तांत्रिक बिघाड होत असल्याने शहराला कमी दाबाने, तसेच अनियमित पाण्याचा पुरवठा होतो. यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात जलसंखटाचा सामना करावा लागतो. एमएमआरडीएच्या पाणीपुरवठा योजनेतील कवडास पंपिंग स्टेशन आणि सुर्यानगर जलशुद्धीकरण केंद्र येथे महावितरणमार्फत वीजपुरवठा होतो. या परिसरात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस होत असल्याने विद्युत तारांवर झाडांच्या फांद्या पडून योजनेचा पाणीपुरवठा वारंवार खंडित होतो.

# जनतेच्या सहनशिलतेचा अंत पाहू नका

## आमदार विलास तरे यांचा महामार्ग प्राधिकरणाला इशारा

**वसई, दि. २ : प्रतिनिधी**



मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर पडलेले खड्डे, रखडलेले उड्डाणपूल, होणारे अपघात, वाहतूक कोंडी यामुळे त्रस्त झालेल्या वाहनचालक आणि सर्वसामान्य नागरीक त्रस्त झाले आहेत. मात्र, यावर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण काहीच कारवाई करत नसल्याने संतापलेल्या आमदार विलास तरे यांनी खानिवडे टोलनाक्याजवळ रास्ता रोको आंदोलन केले. टोल घेता, मग सुविधाही द्या. जनतेच्या सहनशिलतेचा अंत पाहू नका, असा इशारा यावेळी आमदार तरे यांनी दिला.

खानिवडे टोल नाक्यावर दररोज एक ते दोन तास वाहनांच्या रांगा लागतात. परिणामी नागरिक, विद्यार्थी, रुग्ण, महिला यांना प्रचंड हाल सहन करावे लागतात. या गैरव्यवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव घेत आमदार तरे तब्बल दोन तास खुद्द टोल नाक्यावर थांबून वाहतूक सुरळीत केली. "मी लोकप्रतिनिधी असून जनतेच्या वेदना समजून घेतल्या पाहिजेत, मी ते माझ्या कर्तव्याचा भाग समजतो," असे सांगत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले.

पालघर जिल्ह्यातील ससूपाडा (ता. वसई) ते आचड (ता. तलासरी) दरम्यान महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी पडलेले मोठमोठाले खड्डे हे अक्षरशः मृत्यूचे सापळे बनले आहेत. या रस्त्यांमुळे गेल्या एका वर्षात सुमारे 179 निरपराध लोकांनी अपघातात आपला जीव गमावला आहे. हे बळी अपघाताचे नसून, प्रशासनाच्या दुर्लक्षाचे आणि टोल वसूल करून देखभाल न करणाऱ्या यंत्रणेचे आहेत," असा आरोप आमदार तरे यांनी यावेळी केला.

"टोल घेताय, पण सुविधा कुठे?" भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या नियमांनुसार टोल नाक्यावर वाहन जास्तीत जास्त १० मिनिटांपेक्षा अधिक थांबता कामा नये. त्यापेक्षा जास्त वेळ लागल्यास टोल शुल्क माफ करावे, हा नियम आहे. मात्र, प्रत्यक्षात वाहन चालकांना एक-एक, दोन-दोन तास रांगेत उभे रहावे लागते, आणि त्याचवेळी त्यांच्याकडून बिनधास्त टोल वसूल केला जातो. हे सरळसरळ अन्यायकारक आणि फसवणुकीचे उदाहरण असल्याचे आमदार तरे यांनी सांगितले.

टोल बंद करा नाहीतर आम्ही रस्त्यावर उतरू "जर टोल घेत असाल, तर सुविधा देखील द्या. अन्यथा हा टोल वसूल करण्याचा तुम्हाला कोणताही नैतिक अधिकार नाही. रस्त्यांवर खड्डे, टोल नाक्यावर कोंडी, अपुऱ्या सुविधा आणि नागरिकांची रोजची फरपट हे सगळे असह्य झाले आहे. वेळेत उपाययोजना न झाल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन केल्याशिवाय पर्याय राहणार नाही," असा थेट इशाराही आमदार तरे यांनी दिला.

व्यवस्था सुधारा! हे संपूर्ण प्रकरण फक्त रस्त्यांची दुरवस्था किंवा टोल कोंडीपुरते मर्यादित नाही, तर हे शासन, प्रशासन व खासगी टोल व्यवस्थापन कंपन्यांच्या निष्काळजीपणाचे मूर्त उदाहरण आहे. "आम्ही विकासाला विरोध करत नाही, पण विकासाच्या नावाखाली फक्त लुट चालू आहे, आणि त्याचा बळी सामान्य माणूस ठरत आहे," असेही आमदार तरे यांनी ठणकावून सांगितले. यावेळी शिवसेनेचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, पालघर**

**जाहिर निविदा - GEM BID**

अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर हे समाजकल्याण विभाग अंतर्गत अनुदानीत वस्तीगृहातील विदयार्थी/विदयार्थ्यांना बंकबेड, गादी इ, सुविधा उपलब्ध करणे साठी नामांकित मुळ उत्पादक /अधिकृत पुरवठादार यांचेकडुन GEM Bid व्दारे खाली नमुद केलेल्या बाबीची on-line निविदा मागवित आहेत.

सदर निविदेबाबत विस्तृत माहिती https://gem.gov.in/ या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

वरील नमुद साहित्याची GEM Bid online download व online submission पध्दतीने स्विकारण्यात येतील.

यापुढील शुध्दीपत्रक अथवा इतर माहिती ही https://gem.gov.in/ या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

सही/-
डॉ. प्रकाश हसनाळकर
जिल्हा समाज कलयाण अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

सही/-
रविंद्र शिंदे
अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

जा.क्र.पाजिप/वशी/१३१/२०२५ दि. २/०७/२०२५

# नालासोपारा पोलिसांच्या जाचाला कंटाळून बिल्डरची आत्महत्या
# शाम शिंदे, राजेश महाजन यांना अटक

**वसई, दि. २ : प्रतिनिधी**

नालासोपारा शहरात अमली पदार्थाच्या व्यवहारात पोलीसच गुंतले असल्याची चर्चा असताना पोलीस खात्यात कार्यरत राम-शाम याअतिशय फेमस पोलिसांचा नवा कारनामा उजेडात आला आहे. नालासोपाऱ्यातील बिल्डर जयप्रकाश चौहान याने आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या सुसाईट नोटमध्ये शाम शिंदे आणि राजेश महाजन यांच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याचे म्हटले आहे. त्यावरून आचोळे पोलिसांनी शाम शिंदे आणि राजेश महाजन यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर त्यांना अटकही केली आहे.

नालासोपारा पूर्व येथील संयुक्तनगर येथे जयप्रकाश चौहान याने ओम श्री दर्शन ही इमारत पुनर्विकासासाठी घेतली होती. त्या बांधकामासाठी पोलीस शिपाई शाम शिंदे याने त्याच्या नातलगाच्या माध्यमातून ५० लाख रुपये कर्ज म्हणून दिले होते. एका वर्षात दुप्पट रक्कम देण्याच्या आश्वासनावर त्याने हे पैसे दिले. तसेच जामीन म्हणून चार फ्लॅटचा ताबाही दिला होता.

इमारत बांधकामास एक वर्षाहून अधिक काळ झाल्याने पोलीस शिपाई शाम शिंदे आणि त्याचा सहकारी पोलीस शिपाई राजेश महाजन तसेच मध्यस्थ लाला लजपत यांनी जयप्रकाश चौहानकडे पैशांच्या मागणीचा तगादा लावला. जयप्रकाश चौहान यांनी २२ लाख ऑनलाइन आणि १० लाख रुपये रोख असे ३२ लाख शाम शिंदेला दिल्याचे नातेवाईक आणि मित्रांना सांगितले. मात्र तरीही शाम शिंदे आणि त्याचा सहकारी जयप्रकाश यांना पैशासाठी त्रास देत होते, अशी चौहान कुटुंबियांची तक्रार आहे. ती बिल्डिंग आता आमची



आहे, तू सोडून जा, अन्यथा खोट्या गुन्ह्यात अडकवू, अशी धमकी शाम शिंदे याने दिल्याची तक्रार चौहान यांच्या मुलीने केली आहे. शाम शिंदे आणि राजेश महाजन यांच्या त्रासाला कंटाळून जयप्रकाश चौहान यांनी मुलाच्या घरी पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. आपण पोलिसांच्या जाचाला कंटाळून आत्महत्या करीत असल्याचे त्याने चिठ्ठीत नमूद केले असून त्यात शाम शिंदे आणि राजेश महाजन

> खरे गुन्हेगार श्याम शिंदे व राजेश महाजन तर आहेतच परंतु हे दोन पोलीस शिपाई करोडचे मालक कसे झाले. वसई नालासोपारा विरारमधल्या बांधकाम विकासावर यांचा जरब कसा बसला. याचीही चौकशी झाली पाहिजे. करोडोचे मालक असलेले हे पोलीस शिपाई हे तर चेहरा आहेत. परंतु याच्यामागे कित्येक मोठे अधिकारी व त्यांचे काळधन असण्याची दाट शक्यता आहे. पोलीस कर्मचाऱ्यांकडे इतका पैसा आला कुठून ?. पोलीस आरोपी असल्याने तपास निःपक्ष पणे होईल का ?, हे प्रश्न आहेतच. पण, त्यांचे सर्व काळे धंदे आणि गैरमार्गाने मिळवलेली संपत्ती आता जनतेसमोर आम्ही मांडणार.
>
> **- सुशांत पवार, अध्यक्ष, परिवर्तन संघटना**

यांची नावे आहेत. गौरी चौहाण यांच्या तक्रारीवरून आचोळे पोलीस ठाण्यात शाम शिंदे आणि राजेश महाजन यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणात त्यांना अटकही करण्यात आली आहे.

**पोलीस खात्यात राम-शाम नावाचे फेमस**

पोलीस खात्यात शिपाई पदावर असलेल्या शाम शिंदे आणि राजेश महाजन ही जोडगोळी राम-शाम नावाने फेमस आहे. राम-शाम यांच्या अनेक कारनाम्यांची वसई विरार परिसरात गेल्या काही वर्षांपासून चर्चा आहे. प्रारंभी वरिष्ठ पोलिसांच्या संगनमताने अनधिकृत बांधकाम करणाऱ्या बिल्डरांकडून वसुली करण्याचे काम ही जोडगोळी करत असे. त्यामुळे कुठलाही नवा अधिकारी आला की हीजोडगोळी त्यांची प्रिय असे. त्यातूनच याजोडगोळीने प्रचंड बेनामी माया गोळा केली आहे. इतकेच नाही तर वसई विरार परिसरातील अनेक बिल्डरांकडे त्यांची गुंतवणूक असल्याचे उघडपणे बोलले जाते. विधानसभा निवडणुकीच्या आदल्यादिवशी भाजप नेते विनोद तावडे यांच्या कार्यक्रमात हल्ला झाल्याने प्रसिध्दीला आलेल्या विरार पूर्वेकडील हॉटेल विवांता यापंचतारांकीत हॉटेलमध्येही याजोडीची गुंतवणूक असल्याचे उघडपणे बोलले जाते. चौहाण आत्महत्येनंतर ही चर्चा पुन्हा सुरु झाली आहे. राम-शाम पोलीस खात्यातील अनेक वरिष्ठांशी अर्थपूर्ण संबंध ठेऊन असल्याने त्यांना हव्या त्याच ठिकाणी बदली मिळत असल्याने स्थानिक पोलिसांमध्ये नाराजीचा सूर असतो. हा गुन्हा दाखल झाल्यानंतर खऱ्या अर्थाने चौकशी झाली तरच राम-शामचा खरा चेहरा लोकांसमोर येईल, अन्यथा त्यांचे कारनामे गुलदस्त्यातच राहतील, असेही जाणकारांचे म्हणणे आहे.

# अंबरनाथ येथील बाप बेट्यानी केली 65 किलो गोमांसची तस्करी; तीन जण अटकेत

**अंबरनाथ, दि. २ : प्रतिनिधी**

अंबरनाथ येथील जलाउद्दीन करीम शेख, जैनुद्दीन जलाउद्दीन शेख व सकलेन शेख हे बाप बेटे काल सकाळी ६५ किलो गौमांस आपल्या कार मध्ये घेवुन रायता मार्गे अंबरनाथ कडे जात असताना बजरंग दलाच्या काही पदाधिकाऱ्यानी रायता पुलाजवळ त्यांना रंगेहाथ पकडुन त्यांच्या कडे ६५ किलो गौमांस मिळुन आले आहे. त्यांच्यावर टिटवाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन या बाप बेट्याना अटक करण्यात आली आहे.

अंबरनाथ येथील वुलन चाळ येथे राहणारे जलाउद्दीन शेख व त्यांची दोन मुले जैनुद्दीन शेख आणि सकलेन शेख हे काल सकाळीच रायता मार्गे अंबरनाथ कडे ६५ किलो गौमांस घेवुन जाणार अशी माहीती बजरंग दलाच्या काही पदाधिकारी मिळाली, तेव्हा त्यांनी टिटवाळा पोलिसांच्या मदतीने सापळा लावला .दरम्यान हे तीन ही बापबेटे वैगनर कार मधुन गौमांस घेवुन जात होते . तेव्हा त्यांची कार थांबवुन त्या कार ची तपासणी केली असता त्या कार मध्ये ६५ किलो गौमांस मिळुन आले. दरम्यान पोलिसानी ताबडतोब ते गौमांस ताब्यात घेवुन गोमांस तस्करी केल्या प्रकरणी जलाउद्दीन करीम शेख, जैनुद्दीन जलाउद्दीन शेख आणि सकलेन जलाउद्दीन शेख या तीन जणाना अटक केली असुन त्यांची वैगनर कार जप्त केली आहे. या तीन ही आरोपींवर टिटवाळा पोलिस ठाण्यात बी एन एस कलम १३२ , ३२५ , ३ (५ )आणि ५ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियमाचे कलम ५ (सी), ५ (बी), ९ (ए), ९ (बी), ११ आणि प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियमाचे कलम ११ (१) या प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.पोलिस या गुंह्याचा अधिक तपास करत आहेत .

# बदलापूरमध्ये वीर सावरकर उड्डाणपुल प्रवेशद्वारावर दुभाजक
## वाहतूक कोंडीला ब्रेक लावण्यासाठी उपाययोजना

**बदलापूर, दि. २ : प्रतिनिधी**



पावसाळयाच्या कालावधीमध्ये वीर सावरकर उड्डाणपुलावर बऱ्याच वेळा वाहतूककोंडी होते. नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागतो. वाहनचालक उड्डाणपुलाच्या प्रवेशद्वारावर 'यू टर्न' घेऊन शॉर्टकटचा मार्ग अवलंबतात. त्यामुळे या ठिकाणी कोंडी होत आहे.त्याच बरोबर अपघाताचा धोका वाढला आहे. बदलापूर शहरातील एकमेव उड्डाणपुलावर होणारी कोंडी कमी करण्यासाठी बदलापूर नगरपरिषदेने आता पूर्वेतील उड्डाणपुलाच्या प्रवेशद्वारापासून काही अंतरापर्यंत दुभाजक लावण्याचे काम सुरु केले आहे. या भागात उड्डाणपुलावरून उतरणारी वाहने, उड्डाण पुलाच्या दोन्ही बाजूने जागीच वळण घेत असल्याने कोंडी समस्या निर्माण झाली होती. त्यामुळे येथील कोंडीची समस्या सोडवण्यासाठी नगरपरिषदेने दुभाजक बसवण्याचा पर्याय हाती घेतला आहे.

बदलापूर शहरातमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढले आहे. मागील काही दिवसांपूर्वी भुयारी मार्ग बंद होता. तिथून जाणारी वाहनांची वाहतूक इकडील मार्गाने होत होती. त्यामुळे वाहनांचा भार शहरातल्या एकमेव उड्डाणपुलावर पडत होता. त्या कारणानही उड्डाणपुलावर मोठी वाहतूक कोंडी होत होती. त्याचा त्रास सर्वसामान्य नागरिक वाहनचालक,शालेय विद्यार्थी आणि रूग्णांनाही बसला आहे. सातत्याने कोंडी होत असल्याने वाहनचालकांत संतापाचे वातावरण होते. त्यामुळे बदलापूर नगरपरिषद प्रशासनाकडून उड्डाणपूल कोंडीमुक्त ठेवण्यासाठी पाऊले उचलली गेली असल्याने वीर सावरकर उड्डाणपुलावर वाहतूक कोंडी कमी करण्याचा दुभाजकचा प्रयोग यशस्वी होतो की नाही हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. असे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

# सौर कृषी पंपाच्या समस्येसाठी मोबाईलवरून तक्रार निवारण सुविधा

**मुंबई, दि. २ : प्रतिनिधी**

राज्यात विविध योजनांमध्ये ५ लाख ६५ हजार सौर कृषी पंप बसविण्यात आले असून सौर पंप बसविल्यानंतर त्यातील बिघाडाबाबतच्या तक्रारी मोबाईल ॲपवरूनही नोंदविण्याची सुविधा महावितरणने शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली आहे. महावितरणने लाभार्थी शेतकऱ्यांना सौर कृषी पंप बिघडल्यास तक्रार करण्यासाठी यापूर्वी वेबसाईटवरून तक्रार करणे, संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर तक्रार करणे किंवा महावितरणच्या टोल फ्री क्रमांकावर फोन करून तक्रार करणे असे तीन पर्याय उपलब्ध करून दिले होते. आता मोबाईल फोनवरील महावितरणच्या ॲपद्वारे तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महावितरणचे मोबाईल ॲप लोकप्रिय ठरले असून वीज ग्राहक त्याचा वापर आपले वीज बिल जाणून घेणे, बिल भरणे यासह मीटर रिडिंग नोंदणी, वीज चोरी कळविणे, नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरची माहिती कळविणे अशा विविध कामांसाठी करत आहेत. त्याच प्रमाणे आता शेतकऱ्यांना या मोबाईल ॲपमध्ये 'सौर पंप तक्रार' यावर क्लिक करून सौर कृषी पंपाविषयी तक्रार दाखल करता येईल. तक्रार नोंदविताना शेतकऱ्याने सौर कृषी पंपाचा लाभार्थी क्रमांक किंवा नोंदणीकृत मोबाईल क्रमांक लिहिणे गरजेचे आहे. सौर कृषी पंप बसविल्यानंतर पंप चालत नसणे, सौर पॅनेलची नासधूस होणे, सौर ऊर्जा संच काम करत नसणे, सौर पॅनेल्सची किंवा पंपाची चोरी होणे अथवा पंपातून कमी दाबाने पाणी येणे अशा विविध तक्रारी शेतकरी करू शकतील. सौर कृषी पंप संचाचा विमा उतरविण्यात आला आहे.

शेतात सौर कृषी पंप बसविल्यानंतर पाच वर्षे त्याची देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादार कंपनीवर आहे. शेतकऱ्यांनी तक्रार नोंदविल्यानंतर तीन दिवसात तक्रारीचे निवारण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व कंत्राटदारांना त्यांनी ज्या जिल्ह्यात पंप बसविले आहेत त्या जिल्ह्याच्या ठिकाणी सेवा केंद्र उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण झाल्यावर त्यांना मोबाईलवर संदेश मिळेल. शेतकऱ्यांच्या तक्रारी व त्यांचे निराकरण याबाबत कंत्राटदार कंपन्यांच्या कामावर महावितरणच्या प्रत्येक मंडलाच्या अधीक्षक अभियंत्यांची देखरेख राहील.

# उल्हासनगर येथील स्काय डोम हॉल मधील तीन हजार चौरस मीटर वाढीव बांधकामावर तोडक कारवाई

**उल्हासनगर, दि. २ : प्रतिनिधी**

उल्हासनगर कॅंप ३ येथील शांतीनगर परिसरात असलेल्या रिजंसी वाणिज्य ग्रहसंकुलात असलेल्या स्काय डोम या हॉल मधील वाढीव बांधकामावर महापालिकेने तोडक कारवाई केली असुन ,तब्बल ३ हजार चौरस मीटर एवढे मोठे बांधकाम करून त्या हॉलचे मनमाने भाडे आकारले जात होते.

उल्हासनगर कॅंप ३ येथील शांतीनगर परिसरात वालधुनी नदीच्या काठावर अनधिकृतपणे रिजंसी गृह संकुल उभारले असुन या संकुला मध्ये दुसऱ्या मजल्यावर स्काय डोम नावाचा हॉल आहे . हा हॉल वाला त्या हॉल चे मनमानी भाडे आकारुन येथील नागरिकाना लुटत होते . दरम्यान या हॉल मध्ये वाढीव अनधिकृत बांधकाम केले असुन याविषयी प्रहार जनशक्ती पक्षाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष ॲड . स्वप्निल पाटील यांनी सदर हॉल ची तक्रार केली होती . तेव्हा या तक्रारींवरून महापालिकेच्या नगररचना विभागाने सदर हॉल ची पाहणी करून एक वर्षांपूर्वीच नोटीस बजावली होती,परंतु सदर प्रकरण न्यायालयात गेल्याने काही काळ स्थगिती होती . दरम्यान महापालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांच्या आदेशाने सहायक संचालक ललित खोब्रागडे यांनी त्या हॉल च्या वाढीव तीन हजार चौरस मीटर बांधकामावर कारवाई करण्याची नोटीस बजावली असता सहाय्यक आयुक्त गणेश शिंपी यांच्या पथकाने पोलीस बंदोबस्तात स्काय डोम हॉल वर कारवाई केली आहे . तीन हजार चौरस मीटर बांधकाम पाडण्यासाठी तब्बल दोन दिवसांचा कालावधी लागणार असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त शिंपी यांनी दिली आहे.

# मनोर-पालघर मार्गावर साईटपट्टी खचली



> मनोर शहरातील पूर्वेकडील मस्तान नाका बाजूला असलेल्या उतारावर शाळा सुटल्यानंतर रस्ता ओलांडताना विद्यार्थ्यांची दमछाक होते. कित्येक वेळा छोटेमोठे अपघात झाले आहेत. याठिकाणी झेब्रा क्रॉसिंग पट्टी किंवा गरिरोधक बनवणे आवश्यक आहे.
>
> **- इम्तियाज मेमन, नागरिक मनोर**

**मनोर, दि. २ : प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या मुख्यालयाला जोडणारा पालघर-मनोर राज्यमार्ग हा राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्यात आला आहे. यामहत्वाच्या मनोर पालघर रस्त्यावरील वळण परिसरामध्ये रस्त्यांच्या बाजूला असलेली साइडपट्टी ठिकठिकाणी खचल्याने या परिसरात अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.पावसाळ्यात रस्त्यालगत झाडाझुडपी वाढली आहे. नंडोरे नाका ते वाघोबा खिंड, गोवाडा तामसई वळणावर वाढलेल्या गवतामुळे समोरील वाहन दिसत नाही.आणि अपघात होत असतात. या बाबीकडे महामार्ग प्राधिकरण विभाग दुर्लक्ष केले जात असल्याने वाहनचालक त्रस्त झाले आहेत.

पालघर हे जिल्हा मुख्यालय झाल्यामुळे हा रस्ता वाहनांनी गजबजलेला असतो.त्यामुळे रस्ता अरुंद पडू लागला आहे. कधी कधी या रस्त्यावर वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होते. दुचाकी चारचाकी वाहनांचे अपघात वाढत चालले आहेत. साईटपट्टी खचलेली हा देखील अपघाताचा एक भाग आहे. मनोर शहरालगत हातनदी पुलाच्या वळणावर दुचाकी अपघातात होत आहेत.अरुंद वळणामुळे एकमेकांसमोरची वाहने जाण्यासाठी एकच मार्गिका आहे, तीही अपुरी असल्यामुळे असे अपघात घडत असल्याचे सांगितले जाते. वळण रस्त्यावर,पुलाजवळ,शालेय ठिकाणी,अपघात प्रवण क्षेत्र ठिकाणी कुठेही धोकादायक सूचना फलक नसल्यामुळे अपघाताच्या संख्येत वाढ होत आहे.

मनोर शहरात रस्ता रुंदीकरण करून कॉंक्रीटीकरण करून अनेक वर्ष झाले तरी देखील रस्त्यावर सफेद पट्टी मारलेली नाही.अपघात प्रवण क्षेत्र किवा शालेय ठिकाणी धोकादायक झेब्रा पट्टी न मारल्याने शहरात अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मनोर ग्रामपंचायीमार्फत आणि नागरिकांमार्फत वारंवार मागणी करून देखील राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कानाला नागरिकांचा आवाज पोहचत नाही.

# भिवंडीत 6 लाखांच्या वीज चोरी प्रकरणी दोन गुन्हे दाखल

**भिवंडी, दि. २ : प्रतिनिधी**

भिवंडी शहरात वीज वितरण व विज बिल वसुली करणाऱ्या टोरंट पॉवर कंपनी कडून वीज चोरी करणाऱ्यांवर धडक कारवाई करण्यास सुरवात केली आहे.दोन दिवसात भिवंडी शहरात ६ लाख २१ हजार ७०३ रुपयांच्या वीज चोरीचे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कारिवली गावातील वीजग्राहक अमर लक्ष्मण घरत वीज वापरणारे हरी लक्ष्मण घरत यांनी घर क्रमांक ८८० येथे आपल्या आर्थिक फायद्या साठी तेथून जवळ असलेले ट्रान्सफॉर्मरच्या बुशींगला अवैधरित्या केबल जोडून विजमिटर बायपास करुन अनधिकृतरित्या विजपुरवठा घेवून विजचोरीचे १३६४९ विद्युत भार वापरून ४ लाख ८२ हजार ७२१ रुपयांची वीज चोरी केली.तर दुसऱ्या घटनेत चौथा निजामपूर येथील बी एम यू प्लाझा या इमारती मध्ये राहणारा आदम ईस्माईल जावलेकर यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी तेथुन जवळ असलेल्या ट्रानफॉर्मरच्या फ्यूज सेक्शन पिलर मधून जाणाऱ्या अधिकृत केबलला अनधिकृत केबल जोडून विजमिटर बायपास करुन विजचोरीचे ५९७६ विद्युतभार वापरून १ लाख ३८ हजार ९८२ रुपयांची विजचोरी केल्याचे उघड झाले.या दोन्ही प्रकरणात एकूण ६ लाख २१ हजार ७०३ रुपयांच्या वीज चोरीचे दोन गुन्हे शांतीनगर पोलिस ठाण्यात नोंदवण्यात आले आहेत.

# महापालिकेच्या ठेका अभियंत्यांना ईडीचे समन्स?

**वसई, दि. २ : प्रतिनिधी**

वसई विरार महापालिकेच्या निलंबित नगररचना उपसंचालकावर ईडीने कारवाई केल्याच्या पार्श्वभूमीवर ईडीने मंगळवारी वसई विरारमधील काही आर्किटेक्ट आणि बिल्डरांवर धाड टाकून चौकशी केली होती. आता रेड्डी यांच्या नगररचना विभागात त्यावेळी कार्यरत काही ठेका अभियंत्यांना समन्स पाठवून चौकशीसाठी हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत. १४ मे रोजी ईडीने नालासोपाऱ्यातील ४१ अनधिकृत इमारतीप्रकरणात धाड टाकली होती. याधाडीत वाय. एस. रेड्डी यांच्या हैदराबाद येथील घरी रोकड आणि सोन्या-चांदीचे दागिने मिळून तीस कोटींहून अधिकची मालमत्ता जप्त केली होती. तसेच काही महत्वाची कागदपत्रेही हस्तगत केली होती. त्यानंतर अचानक मंगळवारी ईडीने महापालिका हद्दीतील आर्किटेक्ट आणि काही बिल्डरांच्या घरी धाडी टाकल्या होत्या. रेड्डीप्रकरणाच्या चौकशीसंबंधी याधाडी असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, आता महापालिकेच्या नगररचना विभागात रेड्डी यांच्या कार्यकाळात कार्यरत काही ठेका अभियंतेही ईडीच्या रडारवर असून त्यांनाही चौकशीचे समन्स बजावण्यात आल्याचे माहिती सूत्रांनी दिली. त्याचबरोबर महापालिकेत ठेका पध्दतीवर कार्यरत एका महिला वकिलालाही ईडीकडून समन्स आल्याची सूत्रांनी माहिती दिली. ही महिला वकील रेड्डी यांच्या कार्यकाळात नगररचना विभागात कार्यरत होती. काही महिन्यांपूर्वी सायबर अरेस्टप्रकरणात तिला 55 लाख रुपयांचा गंडाही घालण्यात आला होता. एकंदरीत नगररचना विभागातील महिला वकिलासह ठेका अभियंत्यांच्या आर्थिक प्रगतीची माहिती मिळाल्यानेच त्यांच्यामागे चौकशीचा ससेमिरा लागल्याची चर्चा महापालिका वर्तुळात केली जात आहे.

# 100 दिवसांच्या कृती आराखड्यात प्राथमिक शिक्षण का नव्हते?
## कायद्याने वागा लोकचळवळीचा उल्हासनगर मनपा आयुक्तांना सवाल

**उल्हासनगर, दि. २ : प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष सुरू होऊन १५ दिवस उलटून गेले तरी शिक्षणाच्या आशेने इथेतिथे उपऱ्यासारखे सामावून घेतले गेलेले विद्यार्थी आपल्या हक्काच्या जागेत आणण्यात राज्यातील सर्वोत्कृष्ट अशा आपल्या नेतृत्वाखालील प्रशासन सपशेल अपयशी ठरलंय , असं थेट सुनावत कायद्याने वागा लोकचळवळीने शहरातील समस्त मराठी भाषिकांच्या वतीने उल्हासनगर महापालिका प्रशासनाचा तीव्र निषेध केला आहे. उल्हासनगर महापालिका प्रशासनाला सार्वजनिक अवहेलना करून घ्यायची नसेल तर रात्रीचा दिवस करा, दिवसाची रात्र करा, पण निवेदन प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांच्या आत विद्यार्थी-शिक्षक उपऱ्या जागेतून हक्काच्या जागेत म्हणजेच लोकशाहीर आण्णा भाऊ साठे विद्यालयाच्या नव्या इमारतीत स्थानांतरित झालेच पाहिजेत, अन्यथा संघर्ष अटळ आहे, असा इशारा कायद्याने वागा लोकचळवळीचे प्रणेते राज असरोंडकर यांनी आयुक्त मनीषा आव्हाळे यांना दिलेल्या निवेदनात केला आहे. शिक्षण हक्क अधिनियमातील घराजवळ शाळा आणि मुक्त व प्रसन्न वातावरणात शिक्षण या तरतूदींचे उल्हासनगर महानगरपालिकेने तीनतेरा वाजवले असल्याचं प्रतिपादन असरोंडकर यांनी केलं आहे . कुठलंही पूर्वनियोजन न करता उल्हासनगर महानगर पालिकेने खेमानी येथील मनपा शाळा दुरुस्तीच्या नावाखाली बंद केली आणि त्याच भागात नव्याने सुरु झालेल्या खाजगी शाळेला पटसंख्या उपलब्ध व्हावी, म्हणून मोकळं रान उपलब्ध करून दिलं.शाळा बंद करण्याचा निर्णय सरळसरळ व्यावसायिक होता. दुसऱ्या खाजगी शाळेचं भलं व्हावं म्हणून आणि नंतर नवीन इमारतीच्या नावाखाली करोडोंची उधळपट्टी करून मलई खाता गावी म्हणून! यापूर्वीच्या शाळा उभारणीत हेच झालंय, असा आरोप राज असरोंडकर यांनी केला आहे. सुरुवातीला, शाळा सुरू करण्याबाबत प्रशासन पूर्णपणे उदासीन होतं. कधी वित्तीय तरतूद तर कधी विकास आराखड्याचं कारण देऊन टंगळमंगळ करण्यात आली. पण शिवाजी म्हस्के, प्रा . प्रवीण माळवे, तुषार म्हस्के, संजय खरात या स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी शाळा त्याच जागी सुरू व्हावी, माणून आंदोलनात्मक पवित्रा घेतल्यावर हालचाल सुरू झाली. कायद्याने वागा लोकचळवळीने आंदोलनात सहभाग घेतल्यावर मग हालचालींना वेग आला. वर्तमान आणि भविष्यातील संभाव्य पटसंख्या लक्षात घेता, अतिरिक्त मजल्यांना कायद्याने वागा लोकचळवळीने विरोध केला होता. पण बहुतेक ज्यांना भविष्यात खाजगीकरणाच्या माध्यमातून शाळा गिळायचीय, त्यांच्या सोयीने इमारतीचा आराखडा बनवण्यात आलाय, असा गौप्यस्फोट राज असरोंडकर यांनी केला आहे . बघता बघता ८ वर्षे झालीत. रडतखडत का होईना, इमारत उभी राहिली. अर्थात, प्रशासनाला इमारतीतच रस होता. ते काम झालं. शाळा सुरु करण्यात रस असता तर इतकी वर्ष काम लांबलं नसतं. शैक्षणिक वर्ष सुरू व्हायच्या आधीच प्रशासनाने शाळा सुसज्ज केली असती. आत्ताही कळलं की पाणी राहिलंय, बाकं राहिलीत, वगैरे वगैरे... प्रश्न हा आहे की आपल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यात शिक्षणाची जागा होती की नव्हती, असं असरोंडकर यांनी आपल्या निवेदनात आयुक्तांना विचारलंय. मनपा मुख्यालय शाळा इमारतीत हलवणार म्हणून कळल्याचं नमूद करत असरोंडकर यांनी ठणकावल आहे , की असली खुळं जर अधिकाऱ्यांच्या डोक्यात सुरू असतील तर ती ताबडतोब काढून टाका. कित्येक सामाजिक कार्यकर्ते आपला जीव पणाला लावतील पण शाळेच्या इमारतीत अन्य कुठलाही वापर करू देणार नाहीत.मुले गोरगरीबांची आहेत, म्हणून त्यांचा मानसिक छळ करणं सोडा, असं आवाहन असरोंडकर यांनी मनपा आयुक्तांना केलं आहे .

# भिवंडीतील कसायांकडून विहिंप आणि बजरंग दलाने 13 जिवंत गुरे वाचवली

**भिवंडी, दि. २ : प्रतिनिधी**



भिवंडीतील अंजूर फाटा परिसरातील विहिंप आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी कत्तलीसाठी चोरीला जात असलेली १३ जिवंत गुरे कसायांच्या तावडीतून सोडवण्यात यश मिळवले आहे. बजरंग दल भिवंडी जिल्हा संयोजक सूरज केसरवानी यांनी दिलेल्या माहितीनुसार, १ जुलै २०२५ रोजी सकाळी अंजूर फाटा परिसरातील एका इमारतीच्या मागे असलेल्या मोकळ्या मैदानाच्या झुडपात १० गायी आणि तीन वासरे जिवंत आढळल्याची बातमी मिळाली, ही जनावरे कसायांची एक टोळी कत्तलीसाठी चोरणार होती. गोवंशाची बातमी मिळताच बजरंग दलाचे जिल्हा संयोजक सूरज केसरवानी, नागेश मिश्रा, नीर झकारिया, सतीश चौधरी, विमल उपाध्याय आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने कारवाई केली आणि १३ जिवंत गुरे सोडवण्यात यश मिळवले. विहिंप आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी सर्व गायी भिवंडी तालुक्यातील अनगाव येथील गोपाळ गोशाळेत सुरक्षितपणे पाठवल्या आहेत, जिथे त्यांची काळजी घेतली जाईल.दरम्यान गोरक्षकांनी सदर घटनेची माहिती संबंधित नारपोली पोलिस ठाण्यात दिली आहे.

